(इंग्रजीमध्ये टंकलिखित न्यायनिर्णयाचा मराठी अनुवाद. )

[२०२३] ३ एस. सी. आर. ७९०

वीरेन्द्र सिंग

वि.

अतिरिक्त आयुक्त आणि इतर

**(दिवाणी अपील क्र. १७१५/२०२३ )**

**१७ एप्रिल, २०२३**

**(संजय किशन कौल, अहसानुद्दीन अमानउल्लाह आणि अरविंद कुमार, न्या न्या.)**

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ :: कलम १६(१) (झ), ४० – निरर्हता - अपीलकर्ता जिल्हा परिषदेचा सदस्य म्हणून निवडून आला होता - प्रकल्पासाठी काढलेल्या ई-निविदेमध्ये अपीलकर्त्याच्या मुलाच्या नावे कार्यादेश काढण्यात आला होता आणि त्याद्वारे अपीलकर्त्याने अवाजवी वैयक्तिक आर्थिक लाभ मिळविण्याच्या उद्देशाने आपल्या निवडून आलेल्या पदाचा गैरवापर केला होता या कारणास्तव उत्तरवादी क्र. ३ ने अपीलकर्त्याला कलम ४० आणि १६ (१) (झ) अन्वये अपात्र ठरविण्याचा दावा करण्यासाठी केलेली याचिका -विभागीय आयुक्तांनी अर्ज मंजूर केला - अपीलात असा निर्णय देण्यात आला की : अपात्रतेच्या तरतुदींचा मूळ हेतू महापालिका समित्यांमधील प्रशासनाचे पावित्र्य सुनिश्चित करणे हा होता - तथ्यांनुसार अपीलकर्त्याचा मुलगा सध्या अस्तित्वात असलेले कोणतेही कंत्राटी काम करीत होता, अशी ही परिस्थिती नव्हती - अपीलकर्ता निवडून

आल्यानंतर लगेचच त्याच्या मुलाची कंत्राटदार म्हणून नोंदणी करण्यात आली होती - त्याला देण्यात आलेले एकमेव कंत्राट म्हणजे ज्यामधील निधी ग्रामपंचायतीकडे जिल्हा परिषदेकडून येत होता, ज्या जिल्हा परिषदेचा अपीलकर्ता हा सदस्य होता - शिवाय, जिल्हा परिषदेनेच कार्यादेश जारी केला असल्यामुळे, सदर कंत्राटामध्ये जिल्हा परिषदेची पर्यवेक्षकीय आणि मंजूरी प्राधिकरणाची भूमिका दिसून येते, जी सदर अधिनियमाच्या कलम १६ (१) (झ) च्या व्यापक कक्षेत येते - अशा आर्थिक व्यवहारांमध्ये विश्वसनीयता हा अपवाद न राहता नियम असावा - जिल्हा परिषदेनेच मंजूर केलेल्या करारामध्ये आपल्या मुलाने सहभागी होऊ नये, याची खातरजमा करण्याची अपीलकर्त्याची वडील म्हणून मोठी जबाबदारी होती - उच्च न्यायालयाने पारित केलेला आदेश कायम करण्यात आला आहे - न्यायनिर्णयाच्या दिनांकापासून परिणामी अपात्रता लागू होईल.

**अपील फेटाळताना न्यायालयाने असा निर्णय दिला की :**

**१.१ महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ चा उद्देश हा तळागाळात स्थानिक स्वराज्य संस्था व प्रशासनाची ओळख करून देणे आणि राज्य शासनाच्या कामांची आणि विकासयोजनांची अंमलबजावणी जिल्हा परिषदांवर सोपविणे असा आहे. या पार्श्वभूमीवर सदर अधिनियमामध्ये निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींना अपात्र ठरविण्याची तरतूद आहे. प्रमुख आर्थिक जबाबदाऱ्या सोपविण्यात आल्याने, स्थानिक करारांमध्ये पारदर्शकता सुनिश्चित करण्यासाठी आणि निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींच्या गैरवाजवी दडपणाची शक्यता टाळण्यासाठी कायद्याद्वारे तपासणी आणि संतुलनाची व्यवस्था राखली**

आहे. निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींना क्षुल्लक कारणास्तव अपात्र ठरवता कामा नये, यात काहीही शंका नाही. मात्र, पारदर्शकतेच्या उद्दिष्टाला छेद देणारी कामे होऊ देऊ नयेत, हा वैधानिक आदेश तितकाच बांधील आहे. [परि. १५] [७९९-सी-डी]

१.२ विधीमंडळाने समंजसपणे सदर अधिनियमाच्या कलम १६ (१) (झ) अन्वये अपात्रतेची कारणे विस्तृत शब्दांत स्पष्ट केली आहेत. त्यामुळे 'प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष', 'स्वत:चा किंवा तिच्या भागीदाराचा', 'केलेल्या कोणत्याही कामात कोणताही हिस्सा किंवा हितसंबंध', 'जिल्हा परिषदेच्या आदेशान्वये किंवा जिल्हा परिषदेशी केलेल्या कोणत्याही संविदेत', आणि 'जिल्हा परिषदेकडून किंवा तिच्या वतीने' या शब्दांचा वापर करण्यात आला आहे. निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींना स्वाभाविकपणे फायदेशीर ठरणाऱ्या आर्थिक संरक्षणाच्या प्रथेला परावृत्त करण्याच्या हेतूने, जिल्हा परिषदेच्या कामकाजाशी नगरसेवकाचा कोणताही आर्थिक संबंध आहे असे म्हणता येईल अशा सर्व घटनांचा समावेश करण्याचा प्रयत्न करण्यात आला. [परि. १६] [७९९-ई-एफ]

१.३ अपीलकर्त्याचा मुलगा सध्या अस्तित्वात असलेले कोणतेही कंत्राटी काम करीत होता, अशी ही परिस्थिती नव्हती. अर्जदाराच्या निवडणुकीनंतर लगेचच त्याच्या मुलाची कंत्राटदार म्हणून नोंदणी झाली. त्याच्याकडे त्या क्षेत्रात किंवा अन्यथा इतर कोणतेही कंत्राट नव्हते. त्याला देण्यात आलेले एकमेव कंत्राट म्हणजे ज्यामधील निधी ग्रामपंचायतीकडे जिल्हा परिषदेकडून येत होता, ज्या जिल्हा परिषदेचा अपीलकर्ता हा सदस्य होता. अपीलकर्त्याच्या निवडणुकीनंतर लगेचच त्याच्या मुलाची कंत्राटदार म्हणून नोंदणी करण्यात आली होती, कारण त्याने नुकतेच आपले शिक्षण पूर्ण केले होते असा दावा करून अपीलकर्त्याने या परिस्थितीचे

समर्थन करण्याचा प्रयत्न केला होता. ही वस्तुस्थिती अपीलकर्त्याच्या मुलाच्या व्यवसायातील हितसंबंधांबाबत अजूनच शंका उपस्थित करते. [परि. २०] [८००-ई-जी]

१.४ जिल्हा परिषद, धुळे यांनी आरवे ग्रामपंचायतीला दिनांक ०९.०६.२०२० रोजी रस्ते दुरुस्तीचे कार्यादेश जारी केले. हा दस्तऐवज आणि जिल्हा परिषदेच्या उत्तरादाखल केलेल्या प्रतिज्ञापत्रावरून हा निधी राज्य सरकारकडून जिल्हा परिषदेकडे आणि पर्यायाने ग्रामपंचायतीकडे गेल्याचे स्पष्ट होते. अपीलकर्त्याने दिनांक २६.०१.२०२० रोजीच्या ठरावाचे भाषांतर पुरावा म्हणून सादर केले असले तरीही, त्यातून जणू काही ग्रामपंचायत स्वत:चा निधी या प्रकल्पावर खर्च करण्यास तयार होती, असा आभास देण्याचा प्रयत्न केला आहे. कोणत्याही परिस्थितीत, उत्तरवादी क्र. ३ ने या भाषांतरावर गंभीर आक्षेप घेतला आहे. जिल्हा परिषदेनेच दिनांक ०९.०६.२०२० रोजीचा कार्यादेश जारी केला असल्यामुळे, सदर कंत्राटामध्ये जिल्हा परिषदेची पर्यवेक्षकीय आणि मंजूरी प्राधिकरणाची भूमिका दिसून येते, जी सदर अधिनियमाच्या कलम १६ (१) (झ) च्या व्यापक कक्षेत येते. [परि. २१] [८००-जी; ८०१-ए-बी]

१.५ अशा आर्थिक व्यवहारांमध्ये विश्वसनीयता हा अपवाद न राहता नियम असावा, असे आमचे मत आहे. जिल्हा परिषदेनेच मंजूर केलेल्या करारामध्ये आपल्या मुलाने सहभागी होऊ नये, याची खातरजमा करण्याची अपीलकर्त्याची वडील म्हणून मोठी जबाबदारी होती. मुलगा आपल्या आजीकडे राहत असल्याचे दर्शविणाऱ्या शिधापत्रिकेखेरीज, मुलगा आणि वडील यांचे स्वतंत्र वास्तव्य दर्शविणारी कोणतीही कागदपत्रे अभिलेखावर ठेवण्यात आली नव्हती, ही बाब कनिष्ठ न्यायालयांनी निदर्शनास आणून दिली आहे. विशेषतः, जेव्हा मुलाने नुकतेच शिक्षण पूर्ण केले होते, तेव्हा हे असे ना धड इथे होते ना तिथे होते. [परि. २२] [८०१-सी-डी]

**१.६ अपीलकर्त्याला आपला युक्तिवाद सादर करण्यासाठी पुरेशा संधी उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या. तहकुबी मागण्याचा जन्मसिद्ध अधिकार असू शकत नाही, विशेषतः जेव्हा सदर अधिनियमाच्या कलम ४० (२) अन्वये, उत्तरवादी क्र. ३ ने केलेल्या अर्जापासून नव्वद दिवसांच्या कालावधीत अपीलकर्त्याच्या अपात्रतेच्या मुद्द्यावर निर्णय घेणे विभागीय आयुक्तांना बंधनकारक होते. त्यामुळे विभागीय आयुक्तांनी अपीलकर्त्याच्या लेखी निवेदनांना योग्यरीत्या त्याचा बचाव मानला. [परि. २३] [८०१-ई]**

**१.७ न्यायनिर्णयाच्या दिनांकापासून परिणामी अपात्रता लागू होईल. [परि. २३] [८०१-ई]**

धर्मपाल सत्यपाल लि. वि. उपायुक्त, केंद्रीय उत्पादन शुल्क विभाग, गुवाहाटी आणि इतर **(२०१५) ८ एससीसी ५१९ : [२०१५] ६ एससीआर ४३७** ; गुलाम यासीन खान वि. श्री. साहेबराव यशवंतराव वळसकर आणि इतर **एआयआर १९६६ एससी १३३९ : [१९६६] एससीआर ३३९** ; रवी यशवंत भोईर वि. जिल्हाधिकारी, रायगड आणि इतर **(२०१२) ४ एससीसी ४०७ : [२०१२] ३ एससीआर ७७५** ; जेलिया एम. झेवियर फर्नांडिस ई. गोन्साल्वीस वि. जोआना रॉड्रिग्स आणि इतर **(२०१२) ३ एससीसी १८८ : [२०१२] ३ एससीआर २५८ - संदर्भित.**

**<u>विधिनिर्णय संदर्भ</u>**

| | | |
|---|---|---|
| [२०१५] ६ एससीआर ४३७ | संदर्भित | परि. ७ |
| [१९६६] एससीआर ३३९ | संदर्भित | परि. १० |

[२०१२ ३ एससीआर ७७५ संदर्भित परि. ११

[२०१२] ३ एससीआर २५८ संदर्भित परि. १४

दिवाणी अपीलिय अधिकारिता : दिवाणी अपील क्र. १७१५/२०२३.

रिट याचिका क्र. १२५२६/२०२१ मध्ये मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद येथील खंडपीठाच्या दिनांक १७.११.२०२१ रोजीच्या न्यायनिर्णय आणि आदेशापासून.

श्री सुधांशु एस. चौधरी, श्रीमती अमरजितसिंग गिरसे, महेश पी. शिंदे, श्रीमती ऋचा ए. पांडे, एम. विरगावन, अपीलकर्त्याकरिता अधिवक्ते.

विनय नवरे, वरिष्ठ अधिवक्ता, सिद्धार्थ धर्माधिकारी, आदित्य अनिरुद्ध पांडे, भरत बागला, सौरव सिंग, प्रशांत श्रीकांत केंजळे, अमोल बी. कारंडे, नरेंदर राव थानीर, श्रीमती वैष्णवी गुप्ता, वेशाल त्यागी, श्रवण कुमार करनाम, उत्तरवादींकरिता अधिवक्ते.

न्यायालयाचा न्यायनिर्णय **संजय किशन कौल, न्या.** यांनी दिला :-

**तथ्यात्मक परिस्थिती :**

**१.** अपीलकर्ता हा जिल्हा परिषद सदस्य, चिमठाणे गट, तालुका शिंदखेडा, जिल्हा धुळे येथे मान्यताप्राप्त पक्षाचा उमेदवार म्हणून दिनांक ०८.०१.२०२० रोजी निवडून आला होता. परंतु, जिल्हा परिषद निवडणुकीत पराभूत झालेल्या उत्तरवादी क्र. ३ ने दाखल केलेल्या याचिकेमध्ये, विभागीय आयुक्त, नाशिक यांनी दिनांक ०८.११.२०२१ रोजी पारित केलेल्या आदेशाद्वारे त्याला या पदासाठी अपात्र ठरवण्यात आले.

**२.** उत्तरवादी क्र. ३ ने महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ च्या कलम ४० व १६ (१) (झ ) अन्वये वरील याचिका दाखल केली होती (यापुढे 'सदर अधिनियम' असे संबोधण्यात आले आहे). उत्तरवादी क्र. ३ ने अपीलकर्त्याने अवाजवी वैयक्तिक आर्थिक लाभ मिळविण्याच्या उद्देशाने आपल्या निवडून आलेल्या पदाचा गैरवापर केल्याच्या आधारावर अपीलकर्त्याला अपात्र ठरविण्याचा दावा केला. आरवे फाटा ते मौजे आरवे या रस्त्याच्या दुरूस्ती व डांबरीकरणास आरवे ग्रामपंचायतीने केलेला दिनांक २६.०१.२०२० रोजीचा ठराव संमत करण्यात अर्जदाराने बजावलेल्या भूमिकेमुळे हा आर्थिक फायदा झाल्याचे सांगण्यात येते. त्यानंतर, अपीलकर्ता सदस्य असलेल्या जिल्हा परिषद, धुळे यांनी दिनांक ०५.०६.२०२० रोजी या प्रकल्पाला प्रशासकीय मान्यता दिली. सदर अधिनियमाच्या कलम १२५ अन्वये जिल्हा परिषदेच्या अधिकारांचा वापर करून जिल्हा परिषद, धुळे यांनी १५ लाख रुपये खर्चाचा प्रकल्प मंजूर केल्याचे या मंजुरी आदेशात नमूद करण्यात आले आहे.

**३.** या मंजुरीच्या अनुषंगाने, आरवे ग्रामपंचायतीने दिनांक २९.०६.२०२० रोजी ई - निविदा काढली होती. अपीलकर्त्याच्या मुलाने अर्ज केला आणि इतर दोन अर्जदारांविरुद्ध निविदा प्रक्रियेत तो यशस्वी झाला. त्यानंतर आरवे ग्रामपंचायतीने दिनांक २१.०७.२०२० रोजी त्याला मौजे आरवे येथील रस्त्याच्या दुरुस्तीसाठी रु. १४,६२,८७१/- इतक्या रकमेचा कार्यादेश जारी केला.

४. वरील परिस्थितीत, उत्तरवादी क्र. ३ ने असा आरोप केला की, अपीलकर्त्याने आपल्या निवडून दिलेल्या पदाचा गैरवापर केला होता आणि त्यामुळे तो अपात्र ठरण्यास पात्र होता. सदर अधिनियमाच्या कलम १६ (१) (झ) सह कलम ४० अन्वये अर्ज दाखल करण्यात आला होता. संदर्भासाठी, तरतुदी खालीलप्रमाणे उद्धृत करण्यात आल्या आहेत :

> "**१६. निरर्हता**. - (१) पोट-कलम (२) च्या तरतुदींना अधीन राहून कोणतीही व्यक्ती, पुढील बाबतीत निवडून येण्यास आणि परिषद सदस्य होण्यास निरर्ह ठरेल -
>
> .... .... ....
>
> (झ ) जर जिल्हा परिषदेच्या आदेशान्वये केलेल्या कोणत्याही कामात किंवा जिल्हा परिषदेशी केलेल्या किंवा जिल्हा परिषदेकडून किंवा तिच्या वतीने केलेल्या कोणत्याही संविदेत तिचा स्वतःचा किंवा तिच्या भागीदाराचा, प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष असा कोणताही हिस्सा किंवा हितसंबंध असेल;"
>
> "४० (१) कलम ६२, पोट-कलम (२) च्या तरतुदींच्या अधीनतेने, जर कोणताही परिषद सदस्य त्याच्या पदावधीत -
>
> xxx xxx xxx
>
> [(२) या कलमाखाली एखादी जागा रिकामी झाली आहे किंवा कसे याविषयी आयुक्ताने स्वतः होऊन किंवा त्याच्याकडे या बाबतीत

कोणत्याही व्यक्तीने अर्ज केल्यावरून कोणताही प्रश्न उपस्थित केल्यास, आयुक्त [शक्य असेल तेथवर] असा अर्ज मिळाल्याच्या दिनांकापासून नव्वद दिवसांच्या आत त्या प्रश्नाचा निर्णय करील ; आणि त्याचा त्यावरील निर्णय अंतिम असेल. जागा रिकामी झाली आहे असा आयुक्त निर्णय देईपर्यंत परिषद सदस्य म्हणून राहण्यास त्या परिषद सदस्यास वंचित केले जाणार नाही :

परंतु, परिषद सदस्यास आपली बाजू मांडण्याची वाजवी संधी देण्यात आल्याशिवाय कोणत्याही परिषद सदस्याविरुद्ध कोणताही निर्णय दिला जाणार नाही. ]"

**५.** विभागीय आयुक्तांनी अपात्रता अपील क्र. ०१/२०२१ मधील दिनांक ०८.११.२०२१ रोजीच्या आदेशानुसार उत्तरवादी क्र. ३ चा अर्ज मंजूर केला. आरवे ग्रामपंचायत ही धुळे जिल्हा परिषदेच्या अखत्यारीत येणाऱ्या चिमठाणे तालुक्यात असल्याने त्यावर अपीलकर्त्याला प्रभाव पाडता येणे शक्य असल्याचे स्पष्ट होत असल्याचे विभागीय आयुक्तांनी नमूद केले. असेही निरीक्षण नोंदविण्यात आले की, धुळे जिल्हा परिषदेच्या अंतर्गत येणाऱ्या इतर कोणत्याही तालुक्यातून अपीलकर्त्याच्या मुलाला कार्यादेश देण्यात आल्याचा कोणताही पुरावा नव्हता आणि त्यामुळे सदर अधिनियमाच्या कलम १६ (१) (झ) अन्वये अपीलकर्त्याला अपात्र ठरविण्यासाठी सकृतदर्शनी गैरवापराचा निष्कर्ष काढण्यात आला. या टप्प्यावर, या बाबीचीसुद्धा नोंद घेता येऊ शकते की, अपीलकर्त्याच्या विनंतीवरून हे प्रकरण यापूर्वी अनेक

वेळा तहकूब करण्यात आले असल्यामुळे, अपीलकर्त्याच्या लेखी जबाबाला त्याचा युक्तिवाद मानून विभागीय आयुक्तांचा आदेश पारित करण्यात आला होता.

**६.** अपीलकर्त्याने रिट याचिका क्र. १२५२६/२०२१ अन्वये उच्च न्यायालयात रिट याचिका दाखल करून त्याच्या अपात्रतेला आव्हान दिले. उच्च न्यायालयासमोर त्याने मांडलेली निवेदने खालीलप्रमाणे मांडता येतील :

(अ) रस्ता दुरुस्तीचे काम ग्रामपंचायतीच्या सांगण्यावरून, ज्याचे नियमन वेगळ्या अधिनियमान्वये म्हणजेच महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५९ (यापुढे 'ग्रापं अधिनियम' असे संबोधण्यात आले आहे) अन्वये केले जात असल्यामुळे हा अधिनियम या प्रकरणात लागू होणार नाही ;

(ब) जरी हा अधिनियम लागू होत असल्याचे गृहीत धरले तरी, कलम १६ (१) (झ) ची परिभाषा असे सूचित करते की, जर काम जिल्हा परिषदेने स्वतःच हाती घेतले, तरच अपात्रता होऊ शकते. परंतु, प्रस्तुत तथ्यात्मक परिस्थितीत, जिल्हा परिषदेने केवळ पर्यवेक्षकाची भूमिका बजावली ;

(क) अपीलकर्त्याचे आपल्या मुलाच्या आर्थिक व्यवहारात कोणतेही 'हितसंबंध' नव्हते, कारण मुलाचा स्वतंत्र व्यवसाय होता आणि ते दोघे एकत्र राहतसुद्धा नव्हते ;

(ड) अपात्रतेच्या आदेशामुळे नैसर्गिक न्यायाच्या तत्त्वांचे उल्लंघन झाले होते, कारण विभागीय आयुक्तांनी अपीलकर्त्याला सुनावणीची संधी दिली नव्हती.

**७.** परंतु, उच्च न्यायालयाने दिनांक १७.११.२०२१ रोजीच्या आक्षेपित न्यायनिर्णयानुसार वरील युक्तीवाद फेटाळून लावले. खालील निष्कर्षांवर निर्णय आधारित होता :

अ. सदर अधिनियमाच्या कलम (१६) (१) (झ) मध्ये ढोबळमानाने शब्द वापरण्यात आले होते. जिल्हा परिषदेच्या कोणत्याही कामात नगरसेवकाचे हितसंबंध नसावेत, इतकेच नव्हे, तर जिल्हा परिषदेच्या आदेशाने करण्यात आलेल्या कामातही अशा नगरसेवकाचे हितसंबंध नसावेत, अशी तरतूद त्यात करण्यात आली होती. प्रस्तुत तथ्यात्मक परिस्थितीत, जिल्हा परिषदेकडून या कामाचे 'आदेश' देण्यात आले होते, जे तरतूद लागू करण्यासाठी पुरेसे ठरेल. जिल्हा परिषदेच्या उपअभियंत्याच्या देखरेखीखाली दिनांक ०९.०६.२०२० रोजीच्या आदेशान्वये रस्ता दुरुस्तीचे काम हाती घेण्याचे निर्देश जिल्हा परिषदेने ग्रामपंचायतीला दिले होते. जिल्हा परिषदेच्या कार्यकारी अभियंत्याने दिनांक २८.१०.२०२१ रोजी दिलेल्या पत्रामध्येसुद्धा सदर रस्ता जिल्हा परिषदेच्या, जी निधी वितरित करणारी संस्था देखील होती, तिच्या आदेशानुसार विकसित करण्यात येत असल्याचे नमूद करण्यात आले होते.

ब. अपीलकर्ता आणि त्यांचा मुलगा एकत्र राहत होते का, याबाबत विभागीय आयुक्तांनी योग्य निष्कर्ष काढला होता. अपीलकर्त्याचा एकमेव पुरावा म्हणजे शिधापत्रिका होती, ज्यात त्याचा मुलगा त्याच्या आजीकडे राहत असल्याचे दिसून आले. परंतु, मुलाच्या आर्थिक स्वावलंबनाचा हा ठोस पुरावा नव्हता. कोणत्याही

परिस्थितीत ही वस्तुस्थिती न्यायालयाच्या रिट अधिकारक्षेत्राच्या कक्षेत येऊ शकत नाही, असे मत व्यक्त करण्यात आले.

क. सर्व संबंधित वस्तुस्थिती विभागीय आयुक्तांसमोर आधीच असल्यामुळे अपीलकर्त्याला सुनावणीची संधी देण्याची गरज नव्हती. *धर्मपाल सत्यपाल लि. वि. उपायुक्त, केंद्रीय उत्पादन शुल्क विभाग, गुवाहाटी*[1] या प्रकरणामधील या न्यायालयाच्या न्यायनिर्णयाच्या आधारे हा कायदेशीर निष्कर्ष काढण्यात आला होता, ज्यामध्ये असे मत व्यक्त करण्यात आले होते की, जेथे सुनावणी ही केवळ औपचारिकता असेल आणि प्राधिकरणाच्या अंतिम निष्कर्षावर त्याचा कोणताही परिणाम होणार नसेल, तेथे सुनावणीची गरज नाही. त्याहीपेक्षा, अपीलकर्त्याच्या विनंतीवरून विभागीय आयुक्तांनी अनेकवेळा सुनावणी तहकूब केली होती. दिनांक ०८.१०.२०२१ रोजी जरी अपीलकर्ता स्वत: प्रत्यक्ष उपस्थित होता आणि जेव्हा अपीलकर्त्याने वकीलाच्या आजारपणामुळे पुन्हा आणखी वेळ मागितला, तेव्हा विभागीय आयुक्त योग्यरीत्या या निष्कर्षापर्यंत पोहोचले होते की, अपीलकर्त्याला अनेक संधी देण्यात आल्या होत्या आणि म्हणून त्याचा लेखी जबाब त्याचे निवेदन म्हणून समजण्यात यावे. विभागीय आयुक्तांनी दिनांक ०१.११.२०२१ रोजीच्या सविस्तर आदेशाद्वारे तोंडी सुनावणीसाठी अर्जदाराने केलेला स्वतंत्र अर्जसुद्धा फेटाळून लावला होता आणि त्यास अपीलकर्त्याने आव्हान दिले नव्हते.

---

1 (२०१५) ८ एससीसी ५१९

**आमच्यासमोरील अपीलकर्त्याचे प्रकरण :**

**८.** अपीलकर्त्याचा प्राथमिक युक्तिवाद असा होता की, त्याच्या मुलाला जिल्हा परिषद धुळे यांनी नव्हे, तर ग्रामपंचायत आरावे यांनी काम दिले होते. महाराष्ट्र शासनाच्या वेब पोर्टलवर प्रसिद्ध करण्यात आलेल्या ई-निविदा प्रक्रियेद्वारे हे वाटप करण्यात आले. जरी या कामास जिल्हा परिषदेने औपचारिक मान्यता दिली होती, तरी या कामाचा मोबदलाही ग्रामपंचायतीने अपीलकर्त्याच्या मुलाला दिला होता. राज्यघटनेच्या ११ व्या अनुसूचीतील नोंद १३ सह अनुच्छेद २४३ (छ ) अन्वये त्यांना मिळालेले अधिकार लक्षात घेता, दिनांक २०.०७.२०२० रोजीचा कार्यादेशही ग्रामपंचायतीच्या शिक्क्यानिशी देण्यात आला होता.

**९.** अपीलकर्त्याने असे सादर केले की, सदर अधिनियमाच्या कलम १००, १०० (२) व १२५ अन्वये जिल्हा परिषदेने सदर वाटपास केवळ प्रशासकीय व तांत्रिक मान्यता दिली होती. अपीलकर्त्याच्या मुलाने केलेल्या कामाचा मोबदला थेट जिल्हा परिषदेने दिलेला नाही, असे सांगण्यात आले आहे. यासंदर्भात आमच्यासमोर उत्तरवादी क्र. ३ असलेल्या जिल्हा परिषदेने उत्तरादाखल केलेल्या प्रतिज्ञापत्रावर भिस्त ठेवण्यात आली होती.

**१०.** दुसरं म्हणजे, अपीलकर्त्याचे आपल्या मुलाच्या व्यवसायात वैयक्तिक हितसंबंध नव्हते आणि ते एकत्र राहतसुद्धा नव्हते, असा युक्तिवाद करण्यात आला. **गुलाम यासीन खान वि. श्री. साहेबराव यशवंतराव वळसकर**[2] या प्रकरणातील न्यायनिर्णयावर भिस्त ठेवण्यात

2 एआयआर १९६६ एससी १३३९

आली होती, ज्यामध्ये या न्यायालयाने असे निरीक्षण नोंदविले होते की, निवडणुकीतील उमेदवाराचे नगर समितीच्या कर्मचाऱ्याशी केवळ संबंध असल्यामुळे तो उमेदवार निवडणुकीत उभा राहण्यास अपात्र ठरणार नाही.

**११.** तिसरे म्हणजे, अपीलकर्त्याला अपात्र ठरवताना विभागीय आयुक्तांनी नैसर्गिक न्यायाच्या तत्त्वांचे पालन केले नाही, असा युक्तिवाद करण्यात आला होता. अशी विनंती करण्यात आली की, **रवी यशवंत भोईर वि. जिल्हाधिकारी, रायगड**[3] या प्रकरणामध्ये या न्यायालयाने दिलेल्या निर्णयानुसार, कथित गैरवर्तनाची चौकशी केल्याशिवाय निवडून आलेल्या प्रतिनिधीला सहजासहजी त्याच्या पदावरून काढून टाकता येणार नाही. विभागीय आयुक्तांसमोर झालेल्या सुनावणीत, अपीलकर्त्याने आपले वकील आजारी असल्याने त्या दिवशी त्याची विनंती विचारात घेण्याची प्रार्थना केली होती, परंतु सदर विनंती अवाजवीरीत्या फेटाळण्यात आली.

**<u>अपीलकर्त्याच्या दाव्याला उत्तरवादी क्र. ३ ने केलेला प्रतिवाद :</u>**

**१२.** उत्तरवादी क्र. ३ च्या विद्वान वकिलांनी सदर अधिनियमाच्या कलम १६ च्या उद्देशावर, म्हणजेच जिल्हा परिषदेच्या कामकाजात विश्वसनीयता आणण्यावर भर देण्याचा प्रयत्न केला. या पार्श्वभूमीवर अशी विनंती करण्यात आली की, सदर अधिनियमाच्या कलम १६ (१) चे संबंधित पोट-कलम (झ) पुढील तीन प्रवर्गांचा समावेश असलेल्या व्यापक व्याप्तीसह

---

3 (२०१२) ४ एससीसी ४०७

शब्दबद्ध करण्यात आले होते, म्हणजेच (अ) जिल्हा परिषदेच्या आदेशाने करण्यात आलेले काम ; (ब) जिल्हा परिषदेशी कोणत्याही कराराद्वारे करण्यात आलेले काम ; किंवा (क) जिल्हा परिषदेने किंवा तिच्या वतीने करण्यात आलेले काम.

प्रस्तुत प्रकरणात जिल्हा परिषदेच्या आदेशाने काम करण्यात आले होते आणि जिल्हा परिषदेच्याच माध्यमातून देयके देण्यात आली होती. त्यामुळे तथ्ये पूर्णपणे सदर अधिनियमाच्या कलम १६ (१) (झ) च्या कक्षेत येतात आणि अपात्रता स्पष्ट होते, असा आग्रह धरण्यात आला.

**१३.** सादर केलेल्या तथ्यात्मक परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर, अशी विनंती सुद्धा करण्यात आली की, अर्जदार माहे जानेवारी, २०२० मध्ये निवडून आला होता, तर त्याच्या मुलाची जिल्हा परिषद, धुळे येथे दिनांक २०.०२.२०२० रोजी कंत्राटदार म्हणून नोंदणी करण्यात आली होती. अपीलकर्त्याच्या मुलाला देण्यात आलेले कंत्रा**ट** खरोखरच प्रातिनिधिक फायद्याच्या स्वरूपाचे होते. येथे आपण हे लक्षात घेऊ शकतो की, ग्रामपंचायतीच्या दिनांक २६.०१.२०२० रोजीच्या ठरावाच्या भाषांतरित आवृत्तीबाबतसुद्धा काही वाद आहेत. अपीलकर्त्याने पुरावा म्हणून जोडलेल्या आवृत्तीत इतर गोष्टींबरोबरच असे म्हटले आहे की, "आणखी, जेव्हा सदर काम मंजूर होईल आणि जेव्हा सदर काम पूर्ण होईल, तेव्हा ग्रामपंचायत त्या कामाच्या पर्यवेक्षण व दुरुस्तीसाठी होणारा खर्च उचलण्यास तयार आणि इच्छुक आहे, असा ठराव एकमताने मंजूर करण्यात आला.” [एसआयसी] उत्तरवादी क्र. ३ चे प्रकरण असे होते की, या भागाचा मूळ

ठरावात समावेश नव्हता. असे असले तरी, वस्तुस्थिती अशी आहे की, कोणत्याही परिस्थितीत ग्रामपंचायतीकडे हा निधी जिल्हा परिषदेच्या माध्यमातून आला, जो त्यांना राज्य सरकारकडून मिळाला. जिल्हा परिषदेने उत्तरादाखल केलेल्या आपल्या प्रतिज्ञापत्रात ही भूमिकाही घेण्यात आली होती.

**१४.** उत्तरवादी क्र. ३ ने **जेलिया एम. झेवियर फर्नांडिस ई. गोन्साल्वीस वि. जोआना रॉड्रिग्स**[4] या प्रकरणातील न्यायनिर्णयावर भिस्त ठेवली. यात, या न्यायालयाने **गुलाम यासीन**[5] प्रकरण या आधारावर वेगळे दर्शविले होते की, ते प्रकरण प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष आर्थिक फायद्याच्या कारणास्तव स्थानिक स्वराज्य संस्थेच्या सदस्याला अपात्र ठरविण्याशी संबंधित नव्हते. असा युक्तिवाद करण्यात आला की, **जेलिया एम. झेवियर**[6] हे प्रकरण अधिक संबंधित आहे कारण ते गोवा पंचायत राज अधिनियम, १९९४ च्या कलम १० शी निगडित होते, जे सदर अधिनियमाच्या कलम १६ (१) (झ) शी साधर्म्य राखणारे आहे.

**<u>आमचा दृष्टिकोन :</u>**

**१५.** आपण सदर अधिनियमाच्या उद्देशापासून सुरुवात केली पाहिजे; जो तळागाळात स्थानिक स्वराज्य संस्था व प्रशासनाची ओळख करून देणे आणि राज्य शासनाच्या कामांची आणि विकासयोजनांची अंमलबजावणी जिल्हा परिषदांवर सोपविणे असा आहे. या

---

4 (२०१२) ३ एससीसी १८८
5 (उपरोल्लेखित)
6 (उपरोल्लेखित)

पार्श्वभूमीवर सदर अधिनियमामध्ये निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींना अपात्र ठरविण्याची तरतूद आहे. प्रमुख आर्थिक जबाबदाऱ्या सोपविण्यात आल्याने, स्थानिक करारांमध्ये पारदर्शकता सुनिश्चित करण्यासाठी आणि निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींच्या गैरवाजवी दडपणाची शक्यता टाळण्यासाठी कायद्याद्वारे तपासणी आणि संतुलनाची व्यवस्था राखली आहे. निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींना क्षुल्लक कारणास्तव अपात्र ठरवता कामा नये, यात काहीही शंका नाही. मात्र, पारदर्शकतेच्या उद्दिष्टाला छेद देणारी कामे होऊ देऊ नयेत, या वैधानिक आदेशाला आपण तितकेच बांधील आहोत.

**१६.** विधीमंडळाने समंजसपणे सदर अधिनियमाच्या कलम १६ (१) (झ) अन्वये अपात्रतेची कारणे विस्तृत शब्दांत स्पष्ट केली आहेत. त्यामुळे 'प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष', 'स्वत:चा किंवा तिच्या भागीदाराचा', 'केलेल्या कोणत्याही कामात कोणताही हिस्सा किंवा हितसंबंध', 'जिल्हा परिषदेच्या आदेशान्वये किंवा जिल्हा परिषदेशी केलेल्या कोणत्याही संविदेत', आणि 'जिल्हा परिषदेकडून किंवा तिच्या वतीने' या शब्दांचा वापर करण्यात आला आहे. निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींना स्वाभाविकपणे फायदेशीर ठरणाऱ्या आर्थिक संरक्षणाच्या प्रथेला परावृत्त करण्याच्या हेतूने, जिल्हा परिषदेच्या कामकाजाशी नगरसेवकाचा कोणताही आर्थिक संबंध आहे असे म्हणता येईल अशा सर्व घटनांचा समावेश करण्याचा प्रयत्न करण्यात आला.

**१७.** आता आपण लागू होणाऱ्या पूर्वोदाहरणाकडे वळलो तर, **जेलिया एम. झेवियर** या प्रकरणात, या न्यायालयाने **गुलाम यासीन**[7] या प्रकरणातील निर्णय लागू होण्यातील फरक स्पष्ट केला होता. असे मत व्यक्त करण्यात आले की, या न्यायालयाने **गुलाम यासीन** या प्रकरणात असा निर्णय दिला होता की, अपात्र ठरण्यासाठी संविदेतच कोणताही हितसंबंध किंवा हिस्सा असणे आवश्यक आहे आणि केवळ निवडणुकीतील उमेदवार आणि नगर समितीचा कर्मचारी यांच्यातील संबंध अपात्र ठरविण्यासाठी पुरेसे ठरणार नाहीत.

**१८.** आमच्या मते, ही दोन्ही प्रकरणे आमच्यासमोरील तथ्यात्मक वस्तुस्थितीच्या तुलनेत वेगवेगळ्या पायावर आधारित आहेत. **गुलाम यासिन**[8] हे प्रकरण मध्य प्रांत आणि बेरार नगरपालिका अधिनियम, १९२२ च्या कलम १५ (१) ची अर्थउकल करण्याशी संबंधित होते, ज्यामध्ये एखाद्या उमेदवाराला नगर समितीमध्ये 'हितसंबंध' असल्यास त्याला निवडणुकीसाठी उभे राहण्यास अपात्र ठरविण्यात आले होते. शिवाय, न्यायालयाला आणखी एक घटक महत्त्वाचा वाटला तो म्हणजे, त्या प्रकरणातील अपीलकर्त्यास मुस्लिम कायदा लागू होता आणि त्यामुळे तो आणि त्याचा मुलगा समान 'आर्थिक हितसंबंध' असलेल्या अविभक्त कुटुंबातील सदस्य आहेत असे म्हणता येऊ शकत नाही. दुसरीकडे, **जेलिया एम. झेवियर**[9] या प्रकरणामध्ये, हे न्यायालय अशा परिस्थितीची तपासणी करीत होते जेथे अपीलकर्ती पंचायत सदस्य होती आणि तिच्या पतीने बाजार शुल्काच्या वसुलीसाठी संबंधित पंचायतीशी करार केला होता आणि

7 (उपरोल्लेखित)
8 (उपरोल्लेखित)
9 (उपरोल्लेखित)

म्हणून तिला अपात्र ठरविण्यात आले होते. न्यायालयाच्या निर्णयात अखेरीस या बाबीची नोंद घेण्यात आली की, पती आणि अपीलकर्ती -पत्नीच्या पैशाच्या व्यवहारांचे नियमन पोर्तुगीज नागरी कायदा, १८६० द्वारे करण्यात येत होते, ज्याद्वारे विवाहानंतर पती-पत्नीची मालमत्ता विलीन करण्यात आली होती. त्यामुळे असा निर्णय देण्यात आला की, पंचायतीने पतीशी केलेल्या करारात अपीलकर्ती-पत्नीचे आर्थिक हितसंबंध होते.

**१९.** हे तथ्यात्मक फरक असूनही, आम्हाला असे आढळले आहे की, वरील प्रकरणांमधून एक सर्वसाधारण तत्त्व काढता येऊ शकते आणि ते म्हणजे, या न्यायालयाने अपात्रतेच्या तरतुदींचा अति मर्यादित किंवा अति संकुचित पद्धतीने अर्थ लावण्याच्या विरोधात इशारा दिला होता. या दोन्ही प्रकरणांमध्ये या न्यायालयाने असे नमूद केले होते की, अशा तरतुदींचा मूळ हेतू महापालिका समित्यांमधील प्रशासनाचे पावित्र्य सुनिश्चित करणे हा आहे.

**२०.** प्रस्तुत प्रकरणातील तथ्यात्मक वस्तुस्थितीकडे वळून पाहिल्यास असे लक्षात येईल की, अपीलकर्त्याचा मुलगा सध्या अस्तित्वात असलेले कोणतेही कंत्राटी काम करीत होता, अशी ही परिस्थिती नव्हती. अर्जदाराच्या निवडणुकीनंतर लगेचच त्याच्या मुलाची कंत्राटदार म्हणून नोंदणी झाली. त्याच्याकडे त्या क्षेत्रात किंवा अन्यथा इतर कोणतेही कंत्राट नव्हते. त्याला देण्यात आलेले एकमेव कंत्राट म्हणजे ज्यामधील निधी ग्रामपंचायतीकडे जिल्हा परिषदेकडून येत होता, ज्या जिल्हा परिषदेचा अपीलकर्ता हा सदस्य होता. अपीलकर्त्याच्या निवडणुकीनंतर लगेचच

त्याच्या मुलाची कंत्राटदार म्हणून नोंदणी करण्यात आली होती, कारण त्याने नुकतेच आपले शिक्षण पूर्ण केले होते असा दावा करून अपीलकर्त्याने या परिस्थितीचे समर्थन करण्याचा प्रयत्न केला होता. आमच्या मते, ही वस्तुस्थिती अपीलकर्त्याच्या मुलाच्या व्यवसायातील हितसंबंधांबाबत अजूनच शंका उपस्थित करते.

**२१.** जिल्हा परिषद, धुळे यांनी आरवे ग्रामपंचायतीला दिनांक ०९.०६.२०२० रोजी रस्ते दुरुस्तीचे कार्यादेश जारी केले. हा दस्तऐवज आणि जिल्हा परिषदेच्या उत्तरादाखल केलेल्या प्रतिज्ञापत्रावरून हा निधी राज्य सरकारकडून जिल्हा परिषदेकडे आणि पर्यायाने ग्रामपंचायतीकडे गेल्याचे स्पष्ट होते. अपीलकर्त्याने दिनांक २६.०१.२०२० रोजीच्या ठरावाचे भाषांतर पुरावा म्हणून सादर केले असले तरीही, त्यातून जणू काही ग्रामपंचायत स्वत:चा निधी या प्रकल्पावर खर्च करण्यास तयार होती, असा आभास देण्याचा प्रयत्न केला आहे. कोणत्याही परिस्थितीत, उत्तरवादी क्र. ३ ने या भाषांतरावर गंभीर आक्षेप घेतला आहे. आमच्या मते, जिल्हा परिषदेनेच दिनांक ०९.०६.२०२० रोजीचा कार्यादेश जारी केला असल्यामुळे, सदर कंत्राटामध्ये जिल्हा परिषदेची पर्यवेक्षकीय आणि मंजूरी प्राधिकरणाची भूमिका दिसून येते, जी सदर अधिनियमाच्या कलम १६ (१) (झ) च्या व्यापक कक्षेत येते.

**२२.** अशा आर्थिक व्यवहारांमध्ये विश्वसनीयता हा अपवाद न राहता नियम असावा, असे आमचे मत आहे. जिल्हा परिषदेनेच मंजूर केलेल्या करारामध्ये आपल्या मुलाने सहभागी होऊ नये, याची खातरजमा करण्याची अपीलकर्त्याची वडील म्हणून मोठी जबाबदारी होती.

मुलगा आपल्या आजीकडे राहत असल्याचे दर्शविणाऱ्या शिधापत्रिकेखेरीज, मुलगा आणि वडील यांचे स्वतंत्र वास्तव्य दर्शविणारी कोणतीही कागदपत्रे अभिलेखावर ठेवण्यात आली नव्हती, ही बाब कनिष्ठ न्यायालयांनी निदर्शनास आणून दिली आहे. विशेषतः, जेव्हा मुलाने नुकतेच शिक्षण पूर्ण केले होते, तेव्हा हे असे ना धड इथे होते ना तिथे होते, असे योग्य निरीक्षण नोंदविण्यात आले होते.

**२३.** अपीलकर्त्याला आपला युक्तिवाद सादर करण्यासाठी पुरेशा संधी उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या, ही बाब सुद्धा आम्ही लक्षात घेऊ शकतो. तहकुबी मागण्याचा जन्मसिद्ध अधिकार असू शकत नाही, विशेषत: जेव्हा सदर अधिनियमाच्या कलम ४० (२) अन्वये, उत्तरवादी क्र. ३ ने केलेल्या अर्जापासून नव्वद दिवसांच्या कालावधीत अपीलकर्त्याच्या अपात्रतेच्या मुद्द्यावर निर्णय घेणे विभागीय आयुक्तांना बंधनकारक होते. त्यामुळे विभागीय आयुक्तांनी अपीलकर्त्याच्या लेखी निवेदनांना योग्यरीत्या त्याचा बचाव मानला.

**<u>निष्कर्ष :</u>**

**२४.** उपरोक्त विवेचनानुसार, आमचे असे मत आहे की, अपील अयशस्वी झाले पाहिजे आणि त्यानुसार ते फेटाळण्यात येत आहे. या न्यायनिर्णयाच्या दिनांकापासून परिणामी अपात्रता लागू होईल.

**२५.** त्यानुसार अपील फेटाळण्यात येत आहे आणि पक्षकारांनी स्वत:चा खर्च सोसावा.

xxxx

**अस्वीकरण**

या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील या अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याच्या/ तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरिता वापर करता येणार नाही तसेच इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरिता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणी करता वैध मानला जाईल.

x-x-x-x